# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/09/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील मौजा खैरी शिवार नाला येथे दिनांक 19/09/2021 चे 09.45 वा. दरम्यान 1) ट्रॅक्टर क एम.एच– 40/ बी.इ– 1566 व ट्रॉली क एम.एच– 40/ए– 2381 चा चालक आरोपी नामे– रमेश मेश्राम वय 30 वर्ष रा. उमरी (जा.पा), 2) ट्रॅक्टर क एम.एच– 27/एल– 8109 व ट्रॉली क. एम.एच– 31/एच– 6719 चा चालक आरोपी नामे– बादल संजय पालेवार वय 22 वर्ष रा. किरणापुर दफई यांनी आपले ट्रॅक्टर मालक आरोपी क. 3) विलास सतेन्द्रजी आवते, वय 60 वर्ष, रा. बाजार चौक खापा ता. सावनेर याचे सांगणेवरून आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैधरित्या नाल्यातील रेती चोरीने भरून रेती चोरी करीत असतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन 2 ब्रास रेती किंमत 8,000/–रू. व इतर साहित्य असा एकुण वाहनासह कि. 8,12,000/–रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई मंगेश सावरकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चिश्तीया मो नं 8805048777 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावरील मौजा पांजराकाटे शिवार साई मंदिराच्या अलीकडे येथे दिनांक 19/09/2021 चे 05:30 वा. दरम्यान संतोष सकरूजी सहारे(मृतक), वय 70 वर्ष, रा. चमेली हे आपल्या सायकलने पांजरेकाटे वरून साई मंदिर येथे जात होते. त्यादरम्यान नागपूरकडुन अमरावती च्या दिशेने जाणा–या अज्ञात वाहन चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन संतोष सहारे यांच्या सायकलला धडक देवुन गंभिर जखमी केले. या अपघातात त्यांच्या जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी श्री देवेंद्र सोनावले पोलीस स्टेशन कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री देवेंद्र सोनावले मो.नं. 9673526177 हे करीत आहे.

## निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत बरडपवणी शेतशिवार येथे दिनांक 19/09/2021 चे 09:30 वा. दरम्यान आरोपी नामे– बाळकृष्ण मोतीराम सोनुले, वय 45 वर्ष, रा. बरडपवणी ता. नरखेड जि.नागपुर याने आपले ठेक्याने केलेल्या शेतामध्ये लोंखडी सेन्ट्रीगचा तार पऱ्हाटीचे पिकात पुरवुन त्याचे एका टोकाला हिरवा व एका टोकाला लाल रंगाच्या वायरच्या सहायाने लघुदाब वाहीनीवर अवैधरित्या आकोडा टाकुन सेन्ट्रीग तारेत विद्युत प्रवाह प्रवाहीत केल्याने सदर तारेला कोनाचा स्पर्श झाल्यास जिवीत हानी होवु शकते याची जाणीव असतांना सुध्दा तारेचा ईलेक्ट्रीक करंट दिल्याने सदर तारेचा किसन बापुराव टेकाम (मृतक), वय 60 वर्ष, रा. बरडपवणी यांचा स्पर्श झाल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला. सदरचे मरणास आरोपी हे कारणीभुत असल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रज्ञाशील हरीदास डोंगरे, वय 39 वर्ष, रा. प्लट नं. 52 पवन पुत्र नगर सावली अम्मा अर्गा रोड दिघोरी नाका, नागपुर, ह.मु. थडीपवनी पुनर्वसन ता.नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपी विरुध्द कलम 304, 135 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री गावडे मो.नं. 8424043135 हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत गोन्हा जुनी वस्ती येथे दिनांक 11/09/2021 चे 18.30 वा. दरम्यान आरोपी नामे– मंगेश विष्णु बावणे वय 30 वर्ष रा. गोन्हा जुनी वस्ती याने फिर्यादी नामे– एकराम मारोति बागडे, वय 60 वर्ष, रा. गोन्हा जुनी वस्ती तह. कुही यांना म्हटले की ''तु मला जुवा खेळण्यासाठी उसने पैसे का बर दिले नाही''? असे म्हणुन आपल्या हातातील लोखंडी पाईपाने फिर्यादीचे दोन्ही हाताला व पाठीवर, हाताचे बोटाला, ढोपराचे खाली मारून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून ''तु जर मला पैसे दिले नाही तर मी तुला जिवाने मारून टाकीन'' अशी धमकी दिली. अशी तक्रार देणेकामी फिर्यादी हे दि. 11/09/2021 रोजी त्यांनी परस्पर पिएचसी वेलतूर येथे जावुन उपचार करून पोस्टे वेलतुर ला हजर येउन रिपोर्ट दिल्याने सदर फिर्यादीस पुन्हा एमएलसी करिता पिएचसी वेलतूर येथे पाठविले असता त्यास तपासुन डॉक्टरांनी ग्रामीण रूग्णालय कुही येथे रेफर केले असता तेथे फिर्यादीस तपासुन पुन्हा मेडिकल कॉलज नागपुर येथे रेफर केल्याने सिएमओ मेडिकल कॉलेज नागपुर यांनी फिर्यादीस उपचाराकामी भरती केले. सदर फिर्यादीचे उपचाराचे कागदपत्रे व डिस्चार्ज कार्ड प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 504 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार यादवराव कुमरे मो.नं. 9823370970 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत गोंडखैरी येथे दिनांक 19/09/2021 चे 06:00 वा. पुर्वी दिनेश रमेश वानखेडे(मृतक), वय 36 वर्ष, रा. गौंडखैरी वार्ड क्र. 5 ता. कळमेश्वर याने कॅन्सरच्या आजाराला कंटाळुन त्याच्या राहत्या घरी हॉल मध्ये स्लॅपला असलेल्या लोखंडी पाईपला नायलॉन दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश रमेश वानखेडे(मृतक), वय 31 वर्ष, रा. गौंडखैरी वार्ड क्र. 5 ता. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार सपाटे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर